**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे पेटेन्टने सन्मानित

## विद्यापीठाचा गौरव

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांना डिझेल इंजिनसाठी सेंट्रीफ्युगल फ्लुइडाइज्ड चेंबर नावाच्या अभिनव पार्टिक्युलेट सेपरेटरवर पेटेन्ट प्राप्त झाले आहे. भारत सरकारच्या पेटेन्ट कार्यालयाकडून नुकतेच हे पेटेन्ट त्यांना मंजूर करण्यात आले. त्यांच्यासमवेत डॉ.एस.सी. शामकुवर आणि अद्वैत प्रमोद सुंदरे यांना सुद्धा हे पेटेन्ट संयुक्तरित्या बहाल झाले आहे. सेंट्रीफ्युगल फ्लुइडाइज्ड चेंबर डिझेल इंजिनमधून स्वच्छ एक्झॉस्ट मिळविण्यासाठी खूप प्रभावी आहे. गेल्या काही वर्षापासून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे व डॉ.एस.सी. शामकुवर हे डिझेल इंजिनमधून कार्सिनोजेनिक पार्टिक्युलेट मॅटरचे उत्सर्जन कमी करण्यावर संशोधन करीत होते. या संशोधनामध्ये त्यांनी क्लिनर डिझेल एक्झॉस्ट मिळविण्यासाठी प्रक्रियेनंतरचे साधन म्हणून सर्वात लहान सेंट्रीफ्युगल फ्लुइडाइज्ड चेंबर डिझाईन करुन त्याला विकसित केले. विकसित केल्यानंतर त्याची चाचणी केली. सेंट्रीफ्युगल फ्लुइडाइज्ड चेंबरमध्ये एक गोलाकार वाहिनी असते, ज्याद्वारे एक्झॉस्ट गॅस वेगाने जातो आणि केंद्रापसारक क्रियेमुळे घातक कण कमी करुन एस.आय.सी. कणांना चिकटून कण वेगळे केले जातात.

कुलगुरू डॉ. मालखेडे व डॉ. शामकुवर यांनी केलेले संशोधन नाविन्यपूर्ण असून डिझेल इंजिन एक्झॉस्ट स्वच्छ करण्यासाठी पारंपारिक वापरली जाणारी जी पद्धत डिझेल पार्टिक्युलेट फिल्टर्स आहे, ती महाग आणि कमी प्रभावी होती. या संशोधनानंतर सेंट्रीफ्युगल फ्लुइडाइज्ड चेंबरमध्ये डिझेल पार्टिक्युलेट फिल्टर्स तंत्रज्ञानापेक्षा प्रक्रियेनंतर अधिक कार्यक्षम आणि किफायतशीर उपकरण बनण्याची क्षमता त्यामध्ये निर्माण झाली. डॉ. शामकुवर यांनी कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली आचार्य पदवीसाठी संशोधन केले असून त्यांनी डिझेल इंजिन टेल पाईप उत्सर्जनातून कण काढून टाकण्यासाठी किफायतशीर आणि कार्यक्षम तंत्रज्ञान विकसित करण्यामध्ये महत्वाचा सहभाग दिला आहे.

कुलगुरू डॉ. मालखेडे यांना पेटेन्ट बहाल झाल्याबद्दल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विद्यापीठ प्राधिकारिणी सदस्य, विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

कुलगुरू डॉ. मालखेडे यांचे संशोधन व शैक्षणिक कार्यात फार मोठे योगदान राहिले आहे. ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली येथे सल्लागार म्हणून त्यांनी पाच वर्षाहून अधिक काळ कार्य केले असून तीस वर्षापेक्षा जास्त शैक्षणिक व औद्योगिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांना आहे. देशपातळीवर तंत्रशिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. निष्पक्षता आणि संपूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी त्यांनी आर.पी.एस., मोडरॉब्स, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, परिषदांसाठी अनुदान आणि इतर उपक्रमांच्या निधीसाठी ए.आय.सी.टी.ई. मध्ये त्यांनी पूर्णपणे ऑनलाईन प्रणाली स्थापित केली. मुली, दिव्यांग, विद्यार्थी तसेच एम.टेक, पीएच.डी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नियमित मिळावी, यासाठी सुद्धा कार्यप्रणाली विकसित केली. याशिवाय ईशान्य भारतासाठी त्यांनी विशेष योजना आखल्या आहेत. प्राध्यापकांच्या प्रशिक्षणाद्वारे गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांनी नेहमीच प्राध्यान्य दिले. ए.आय.सी.टी.ई. द्वारा मान्यताप्राप्त संस्थामध्ये पीएच.डी. अभ्यासक्रम सुरु करण्यास त्यांनी प्राध्यान्य दिले. विदेशातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारतीय विद्यार्थी संघ पाठविण्याच्या त्यांच्या पुढाकाराने देशाचे नाव जगात उंचावले आहे. इंटर्नशीपसाठी कॅनेडियन विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्याची योजना त्यांनी सुरु केली. नवनिर्मितीची भावना जागृत करण्यासाठी त्यांनी २०१७ आणि २०१८ मध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन आयोजित केली, त्यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तो उपक्रम आता देशव्यापी चळवळ झाली आहे.

पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात विभागप्रमुख म्हणून कार्यरत असतांना त्यांनी बाजा, इफिसायकल, गो-कार्ट, सौरउर्जा कार यासाठीच्या संशोधनासाठी प्रयोगशाळा स्थापित केली. त्यांच्या विद्यार्थ्यांनी वर्षानुवर्ष बाजा-दक्षिण आफ्रिका आणि बाजा-यु.एस.ए. मध्ये उत्कृष्ट कामगिरी करुन आपल्या देशाचे नाव उंचावले. त्यांचे नामांकित जर्नल्समध्ये, परिषदांमध्ये अनेक संशोधन पेपर प्रकाशित झाले आहे. याशिवाय अभ्यासक्रमामध्ये त्यांच्या धड्यांचा समावेश असून त्यांना यापूर्वी दोन पेटेन्टने सन्मानित करण्यात आले आहे. देशभरातील तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ए.आय.सी.टी.ई. मधील विविध धोरण प्रक्रियेमध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग राहिला असून पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम वेळोवेळी अद्ययावत करण्यामध्ये त्यांचा पुढाकार महत्वपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीयकरण, रॅकींग, स्वायत्तता आदी क्षेत्रामध्ये त्यांचा अभ्यास आहे.

भारताचे उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरणासह दुबई, कुवेतमध्ये कार्यरत भारतीय अभियंतांच्या तांत्रिक समस्यां सोडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. ऑक्सफोर्ड, कँब्रिज, क्वीनमेरी आणि वेस्टमिन्स्टर विद्यापीठांना त्यांनी भेटी दिल्या असून न्यूयॉर्क विद्यापीठ, मॅसाच्युसेट टेकनिकल इंन्स्टिट्युट, हावर्ड विद्यापीठ, पेन सिल्व्हेनिया विद्यापीठ येथे गेलेल्या भारतीय शिष्टमंडळाचे त्यांनी नेतृत्व केले आहे. एज्युकॉन २०१५ मधील सहभागासह त्यांनी जर्मनी, स्वीत्झरलँड, स्पेन, फ्रान्स आणि पोर्तुगोल देशांना भेटी दिल्या आहेत. स्वयम, अर्पित, मूक्स यावरील व्हिडीओ अभ्यासक्रम त्यांच्या प्रोत्साहनामुळे शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणत आहे. भारत सरकारच्या अनेक महत्वपूर्ण समित्यांवर त्यांनी अध्यक्ष व सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०१/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी